क्र. अपोमसं(का.व सु.)/स्वीस/मा.मुख्यमंत्री-कृती/
आराखडा/१७६/२०२५
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००५
दिनांक :- ०९/०४/२०२५

संदर्भ :- मा.मुख्यमंत्री सचिवालय ई ऑफिस क्र.८१७०८८६, दिनांक ०८/०४/२०२५

विषय :- १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम
कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे मुल्यमापन करण्यासाठी गुणांकन तक्ता ठरविणे.

*****

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविण्यात येते की, १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राज्यात राबविली जात असून त्यामध्ये राज्यातील विविध कार्यालयाचे मुल्यमापन करण्यात येणार आहे.

तरी सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भिय पत्र व सहपत्रानुसार पोलीस स्टेशनचे गुणांकन करण्यात यावे आणि पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

(के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मंबई यांचेकरीता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

प्रत माहितीस्तव,
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / लोहमार्ग )
विशेष पोलीस महानिरीक्षक, (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना )
सहायक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## उत्कृष्ट जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाची निवड प्रक्रिया

| | | |
|---|---|---|
| 34<br>जिल्हा पोलीस अधीक्षक | 8<br>जिल्हा पोलीस अधीक्षक | |
| जिल्हा पोलीस अधीक्षक हे संबंधित IG/DIG यांना अंतिम सादरीकरण ई-मेल ने पाठवतील. → | IG/DIG यांनी 8 सर्वोतम जिल्हा पोलीस अधीक्षक निवडून अंतिम सादरीकरण QCI ला ई-मेल ने पाठवावे. → | प्राप्त 8 प्रस्तावांमधून राज्यातून 3 जिल्हा पोलीस अधीक्षकांची निवड QCI करणार. |
| 18-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 21-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 28-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत |

## उत्कृष्ट परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक/ उप महानिरीक्षक कार्यालयाची निवड प्रक्रिया

| | | |
|---|---|---|
| 8<br>Range IG/DIG | 3<br>Range IG/DIG | |
| IG/DIG हे पोलीस महासंचालक यांना अंतिम सादरीकरण ई-मेल ने पाठवतील. → | पोलीस महासंचालक यांनी 3 सर्वोतम IG/DIG निवडून अंतिम सादरीकरण QCI ला ई-मेल ने पाठवावे. → | प्राप्त 3 प्रस्तावांमधून राज्यातून 1 IG/DIG यांची निवड QCI करणार. |
| 18-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 21-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 28-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत |

## उत्कृष्ट पोलीस आयुक्त कार्यालयाची निवड प्रक्रिया

| | | |
|---|---|---|
| 11<br>पोलीस आयुक्त | 5<br>पोलीस आयुक्त | |
| पोलीस आयुक्त हे अपर मुख्य सचिव, गृह यांना अंतिम सादरीकरण ई-मेल ने पाठवतील. → | अपर मुख्य सचिव, गृह यांनी 5 सर्वोतम पोलीस आयुक्त निवडून अंतिम सादरीकरण QCI ला ई-मेल ने पाठवावे. → | प्राप्त 5 प्रस्तावांमधून राज्यातून 2 सर्वोतम पोलीस आयुक्तांची निवड QCI करणार. |
| 18-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 21-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत | 28-04-2025<br>सायं. 7 वाजेपर्यंत |

मुख्यमंत्री सचिवालय
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक :

मुख्यमंत्री सचिवालय
दिनांक :- 8/4/25
ई. ऑफिस क्र. 8170886

प्रति,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषय : १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम.
कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी गुणांकन तक्ता ठरविणे.

महोदया,

१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राज्यात राबविली जात असून त्यामध्ये राज्यातील विविध कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून पोलीस स्टेशनच्या मूल्यांकनासाठी सूचविण्यात आलेला गुणांकन तक्ता सोबत जोडला आहे. कृपया पोलीस स्टेशनचे त्यानुसार गुणांकन करण्यात यावे आणि उर्वरीत कार्यालयांचे मूल्यमापन या कार्यालयाने निश्चित केलेल्या गुणांकन तक्त्यानुसार करण्यात येईल, यांची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला,

(हनुमंत व्यं. आरगुंडे)
उप सचिव

प्रत माहितीस्तव : प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

## क्षेत्रीय कार्यालयातील सुधारणा कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी गुणांकन तक्ता

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १. | कार्यालयीन कामकाज व तक्रार निवारण कामकाजाचे मूल्यमापन | |
| (अ) | डायल ११२ प्रणालीवर पोलीस स्टेशनचा प्रतिसाद वेळ (०१.०२.२०२५ ते ३०.०४.२०२५ या कालावधीसाठी) | १० |
| (आ) | पीडित व्यक्तीला मालमत्ता परत केल्याच्या प्रकरणांची संख्या आणि मालमत्तेचे मूल्य. | २ |
| (इ) | न्यायालयाच्या आदेशांनुसार मुद्देमालाची विल्हेवाट लावणे / प्रकरणांची संख्या (टक्केवारीमध्ये -०१.०१.२०२५ ते ३०.०४.२०२५ या कालावधीसाठी) | २ |
| (ई) | आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण (दि. ३० एप्रिल, २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | २ |
| (उ) | अभ्यागत भेटींचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिद्धी | २ |
| (ऊ) | चारित्र्य पडताळणी अर्जांच्या निराकरणाची टक्केवारी (०१.०२.२०२५ ते ३०.०४.२०२५ या कालावधीसाठी) | २ |
| | एकूण | २० |
| २. | सुकर जीवनमान :- | |
| (अ) | नागरी सेवांचे सुलभीकरण (किमान २ सेवा)<br><br>(पूर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदलांची तुलना आवश्यक) | प्रत्येक सेवेसाठी ५ गुण |
| (आ) | Scheme I/ उपक्रम १ | ५ |
| (इ) | Scheme II / उपक्रम २ | ५ |
| | एकूण | १० |
| ३. | स्वच्छता | |
| (अ) | अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण | २ |
| (आ) | मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे | २ |
| (इ) | जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण | २ |
| (ई) | जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट | २ |
| (उ) | पोलिस ठाण्याच्या आवारात असलेल्या बेवारस वाहनांचा आणि इतर वस्तूंचा लिलाव/विल्हेवाट लावणे | २ |
| | एकूण | १० |

| | | |
|---|---|---|
| ४. | कार्यालयीन सोई सुविधा | |
| (अ) | कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | २ |
| (आ) | कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था | २ |
| (इ) | अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था | २ |
| (ई) | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे | २ |
| (उ) | कार्यालयाचे सौंदर्यीकरण | २ |
| | एकूण | १० |
| ५ | क्षेत्रीय कार्यालयांना भेटी | |
| (अ) | आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे | २.५ |
| (आ) | केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे | २.५ |
| (इ) | क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजांवर देखरेख ठेवणे | २.५ |
| (ई) | ग्राम स्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव,अडचणी व सूचना यांवर त्वरीत कार्यवाही करणे. | २.५ |
| | एकूण | १० |
| ६. | आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन | |
| (अ) | गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे | ३ |
| (आ) | व्यापारी / कामगार संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे | २ |
| (इ) | गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे | २ |
| (ई) | गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे | ३ |
| | एकूण | १० |
| ७. | **अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, नवीन कायद्याचा प्रसार व प्रसिद्धी** | |
| (अ) | ३ नवीन फौजदारी कायद्यांमध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची टक्केवारी | ५ |
| (आ) | ३ नवीन फौजदारी कायद्याचा जनतेत प्रसार व प्रसिद्धी | ५ |
| | एकूण | १० |
| ८. | नाविन्यपूर्ण उपक्रम | |
| | कार्यालयामध्ये किमान २ नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे | प्रत्येक सेवेसाठी १० गुण |

| | | |
|---|---|---|
| | Scheme I/ उपक्रम १ | १० |
| | Scheme II / उपक्रम २ | १० |
| | एकूण | २० |
| | एकूण (अ.क्र. १ ते अ.क्र.८) | १०० |

* डायल ११२ प्रणालीवर प्रत्येक युनिट कमांडरकडे त्याच्या युनिटचा दररोज/मासिक आधारावर सरासरी प्रतिसाद वेळ असतो. या निकषावर प्रत्येक पोलिस स्टेशनला, त्या पोलीस स्टेशनच्या सरासरी प्रतिसाद वेळेची तुलना जिल्ह्याच्या सरासरी प्रतिसाद वेळेशी करून आणि पोलिस स्टेशन प्रामुख्याने ग्रामीण आहे की शहरी भागात आहे याचा विचार करून, गुण दिले जावेत.